लोकमत

महावितरण

# जाहीर सुचना

महावितरण संवसु मंडल चंद्रपुर अंतर्गत चंद्रपुर/वरोरा/बल्लारशा/विभागाच्या आस्थापनेवर एक वर्ष (2024-2025) कालावधी करिता विजतंत्री/तारतंत्री व कोपा (COPA) व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यासाठी दिनांक 01.06.2024 ते 07.06.2024 पर्यंत 6.15 वाजेपर्यंत **www.apprenticeshipindia.org** या संकेतस्थळा वरील खालील नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | विभागांचे नांव | आस्थापना क्रमांक | व्यवसाय | | | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विजतंत्री | तारतंत्री | कोपा | |
| 1 | चंद्रपूर विभाग | E-03172700621 | 25 | 16 | 10 | 51 |
| 2 | वरोरा विभाग | E-10202700124 | 17 | 14 | 6 | 37 |
| 3 | बल्लारशा विभाग | E-03172700784 | 21 | 10 | 8 | 39 |
| | | | 63 | 40 | 24 | 127 |

सदर भरती ही चंद्रपुर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या उमेदवारास प्राधान्य राहिल.

(1) **शैक्षणिक अर्हता -** महाराष्ट्र राज्य शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (2) **वयोमर्यादा** : दिनांक 07.06.2024 रोजी किमान वय 18 वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. मागासवर्गीयासाठी 05 वर्षे शिथिलक्षम. (3) **विद्यावेतन** : शासकीय नियमाप्रमाणे देय राहील. (4) शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. (5) एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्राची प्रत आधार कार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी. (6) **आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (चार सेमिस्टर गुणपत्रिका) जोडण्यात यावी.** (7) उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र सांक्षाकीत केलेली छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. (8) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास उमेदवारी अर्ज रद्द करण्यात येईल. (9) उमेदवारांचे ऑनलाईन व्यतिरिक्त इतर माध्यमातून आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक राहील. (10) वरील प्रमाणे नमुद कालावधीत अर्ज सादर न केल्यास त्यानंतरच्या व पुर्वीच्या तारखेस सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (11) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित असलेला स्वतःचा E-mail ID व Mobile No. नोंदविणे आवश्यक राहील. (12) उमेदवारांची निवड ही आय.टी.आय. मधील प्राप्त गुणपत्रीकेच्या गुणवत्तेनुसार (Merit List) करण्यात येईल. (13) **उमेदवाराने कोणत्याही एकाच विभागासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा एका पेक्षा जास्त विभागामध्ये अर्ज सादर केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल तसेच याबाबत उमेदवारास कळविले जाणार नाही.** (14) उमेदवाराने सादर केलेल्या ऑनलाईन अर्जानुसार उमेदवारांची विभाग निहाय निवड यादी कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.

**अधीक्षक अभियंता,**
**महावितरण, संवसु मंडल चंद्रपुर**

पी.आर.ओ.क्र.-27, दि. 27.05.2024